# FAMILY COURT MUMBAI

ADMINISTRATIVE BUILDING."B" WING, BANDRA EAST, BKC,MUMBAI 51. Tel/Fax 022 26591270 Email fc-bhc@nic.in

कौटुंबिक न्यायालय, मुंबई
दिनांक : २९/०७/२०२०

प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, मुंबई खालील आदेश निर्गमित करीत आहे.

## कार्यालयीन आदेश क्रमांक १५९ / २०२०

असे निदर्शनास येत आहे की, कौटुंबिक न्यायालय, मुंबई येथे पक्षकार यांना त्यांच्या प्रलंबित प्रकरणात जमा असलेल्या मासिक पोटगीची रक्कम काढणेसाठी अर्ज सादर करणे, त्यानंतर सदर पोटगीची रक्कम घेण्यासाठी व संबंधित रजिस्टरमध्ये स्वाक्षरी करण्यासाठी कार्यालयात वारंवार यावे लागते.

सध्या कोव्हिड–१९ चा संसर्ग मोठया प्रमाणात सुरु असून या महामारीचा संसर्ग टाळण्यासाठी दिनांक २३/०३/२०२० पासून लॉकडाउन सुरु आहे. त्याकरीता ज्या पक्षकारांनी त्यांची **मासिक पोटगीची रक्कम** काढण्यासाठी बँकेची तपशिलवार माहिती व आय.डी.प्रुफ कार्यालयात सादर केलेले आहे व त्यांची पोटगीची रक्कमही न्यायालयात जमा करण्यात आलेली आहे अशा पक्षकारांच्या पोटगीच्या रक्कमा त्यांच्या बँक खात्यात परस्पर एन.ई.एफ.टी द्वारे जमा करण्यात यावी.

त्याव्यतिरिक्त ज्या पक्षकारांच्या मासिक पोटगीच्या रक्कमा न्यायालयात जमा केल्या जातात परंतु त्या पक्षकारांनी त्यांची **मासिक पोटगीची रक्कम** काढण्यासाठी बँकेची तपशिलवार माहिती व आय.डी.प्रुफ कार्यालयात सादर केलेले नाही अशा पक्षकारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी स्वत: अथवा वकीलामार्फत त्यांचे विहित नमुन्यात बँकेची तपशिलवार माहिती व आय.डी.प्रुफ न्यायालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सकाळी १०.३० ते १.०० वाजेपर्यंत सादर करावी. सोबत विहित नमुना जोडला आहे.

त्यानंतर संबंधित पक्षकारांनी त्यांच्या पोटगीची रक्कम मिळणेसाठी वरील सुचनेप्रमाणे सादर केलेल्या विहित नमुन्यातील माहिती प्राप्त झाल्यानंतर अशा सर्व ER & RD मधील पक्षकारांना त्यांच्या पोटगीच्या रक्कमा मागणीचे अर्ज नसतील तरीही त्यांच्या बँक खात्यात परस्पर <u>एन.ई.एफ.टी</u> द्वारे जमा करण्यात यावी.

त्याचप्रमाणे सदरची मासिक पोटगीची रक्कम त्यांच्या बँक खात्यात <u>एन.ई.एफ.टी</u> द्वारे जमा करण्यात आल्यावर त्याबाबतची नोंद "डी" रजिस्टरमध्ये (स्वाक्षरी ऐवजी) घेण्यात यावी.

कौटुंबिक न्यायालय, मुंबई
दिनांक : २९/०७/२०२०

प्रमुख न्यायाधीश,
कौटुंबिक न्यायालय, मुंबई.

प्रत रवाना :

१ न्यायाधीश, न्या.क्र. १ ते ७, कौटुंबिक न्यायालय, मुंबई
२ विवाह समुपदेशकांचे कार्यालय, कौटुंबिक न्यायालय, मुंबई
३ कोर्ट मॅनेजर, कौटुंबिक न्यायालय, मुंबई
४ प्रबंधक, कौटुंबिक न्यायालय, मुंबई
५ अध्यक्ष, बार असोसिएशन कौटुंबिक न्यायालय, मुंबई
६ उप प्रबंधक, कौटुंबिक न्यायालय, मुंबई
७ अधिक्षक/शिरस्तेदार, सर्व विभाग, कौटुंबिक न्यायालय, मुंबई
८ अधिक्षक/शिरस्तेदार, न्यायालय क्र. १ ते ७, कौटुंबिक न्यायालय, मुंबई
९ लिपिक, संगणक विभाग, कौटुंबिक न्यायालय, मुंबई

## IN THE FAMILY COURT, MUMBAI

**PETITION NO.**

______________________________ **....... PETITIONER**

**V/S**

______________________________ **....... RESPONDENT**

## Customer Account Information

Customer Name =

Customer Bank Account Number =

Customer Bank Account Type =

Bank IFSC (11 Characters) =

Customer Address =

Leadger No. (Cash Dept) =

Signature of the Petitoner/Respondent

Encl. :
1. Xerox copy of the Pass Book (Self Attested)
2. Xerox Copy of the Adhar Card (Self Attested)
3. Passport Size Photo (Two)
4. Revenue Stamp of Rs.1 (Two)